रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

वर्ष १७ ◆ अंक २५२
www.ramprahar.com

रविवार, ३० मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

# राज्यात 1 एप्रिलपासून स्वस्त दरात वीज



**मुंबई : प्रतिनिधी**

गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर राज्य सरकारने सर्वसामान्यांना मोठे गिफ्ट दिले आहे. वीजदरामध्ये कपात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एक एप्रिलपासून नवे दर लागू होणार आहेत. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडून नवे वीज दर जाहीर करण्यात आले आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने (MERC) आर्थिक वर्ष २०२५-२६ ते आर्थिक वर्ष २०२९-३० साठीच्या बहु-वर्षीय दर (MYT) प्रस्तावाला मान्यता दिल्यानंतर आता टाटा पॉवरकडून देखील वजी दरात कपात केली जाणार आहे, ज्याचा फायदा मुंबईतील तब्बल आठ लाख ग्राहकांना होणार आहे, पाच वर्षांमध्ये २८ टक्के एवढी वीज दरात कपात होणार आहे.

शहराच्या उपनगरीय भागात टाटा पॉवरचेदेखील ०-१०० kWh आणि १००-३०० kWh श्रेणीतील दर कमी केले जाणार आहेत. टाटा पॉवरचे सरासरी दर हळूहळू कमी होत जाणार आहेत, जे कि ९. १७ रुपये प्रति kWh वरून २०२९-३० या आर्थिक वर्षामध्ये ६.६३ रुपये प्रति kWh पर्यंत कमी होतील.

## महाराष्ट्रात पुन्हा 'अवकाळी'चा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानाचा उच्चांक दिसत आहे. उन्हाचा चटका असह्य झाला आहे. दरम्यान, भारतीय हवामान केंद्राने गुढीपाडव्यापासून आता संपूर्ण राज्यभर अवकाळी पावसाचे इशारे दिले आहेत.

दक्षिण मध्य महाराष्ट्रापासून अवकाळी पावसाला सुरुवात होणार आहे. ३१ मार्चला ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदुरबार, अहिल्यानगर, सातारा सांगली कोल्हापूर आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना येलो अलर्ट देण्यात आला आहे. १ एप्रिलला ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली, सातारा पुणे नाशिक, नगर जळगाव छत्रपती संभाजी नगर बीड जालना बुलढाणा अकोला वाशिम अमरावती या जिल्ह्यांना येलो अलर्ट देण्यात आला आहे. २ एप्रिलला संपूर्ण महाराष्ट्राला पावसाची शक्यता आहे.




## आयपीएस अधिकाऱ्याचे अपघातात निधन

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएस सुधाकर पठारे यांचे अपघाती निधन झाले आहे. तेलंगणातील श्रीशैलम येथून ते नागरकुरलूनकडे जात असताना त्यांच्या कारचा अपघात झाला आणि त्यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे.

पठारे हे ज्या गाडीतून प्रवास करत होते त्या गाडीची ट्रकसोबत धडक झाली आणि हा अपघात झाला. सुधाकर पठारे हे २०११ बॅचचे आयपीएस अधिकारी आहेत. त्यांच्या अपघातामुळे महाराष्ट्र पोलीस दलावर शोककळा पसरली आहे. पठारे सध्या मुंबई पोलीसमध्ये पोर्ट झोनचे डीसीपी म्हणून कार्यरत होते. **(पान ५ वर..)**









# कर्मवीर अण्णांनी एक मिशनने काम केले -खासदार शरद पवार



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षण व त्या अनुषंगाने ज्ञान समाजाच्या शेवटच्या माणसापर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टिकोनातून कर्मवीर अण्णांनी एक मिशन म्हणून काम केले, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी वावंजे येथे केले. रयत शिक्षण संस्थेच्या वावंजे येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व कै. गोटीराम पाटील कॉमर्स सायन्स ज्युनिअर कॉलेज व लक्ष्मण अर्जुन पाटील परी प्रायमरी इंग्लिश स्कुलच्या नवीन इमारतीचे उदघाटन रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

या सोहळ्याला प्रमुख मान्यवर म्हणून रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील, थोर देणगीदार व मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर, सचिव विकास देशमुख, एन. डी. पाटील यांचे चिरंजीव प्रशांत पाटील, माजी आमदार बाळाराम पाटील, जनरल बॉडी सदस्य महेंद्र घरत, उद्योजक जे. एम. म्हात्रे, जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, माजी सचिव व प्राचार्य गणेश ठाकूर, विठ्ठल शिवणकर, स्थानिक शुल्क कमिटी चेअरमन जी. आर.पाटील, पंकज पाटील, डी . बी. म्हात्रे, एम. डी. पाटील, वासुदेव चोरमेकर, सचिन पाटील यांच्यासह पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

शरद पवार यांनी पुढे बोलताना म्हटले की, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात शिक्षण पोहोचविण्यासाठी कर्मवीर अण्णांनी शिक्षण संस्था उभी केली आणि लक्षावधी विद्यार्थी हे जीवनाच्या विविध क्षेत्रामधील शिक्षण घेऊन अतिशय मोलाची कामगिरी करत आहे. त्यांची तयारी कर्मवीरांच्या विचारातून झाली आणि या विचाराचा विस्तार होत आहे. एक काळ असा होता कि हा विस्तार सातारा, कोल्हापूर व सांगली अशा विभागात होत होता. रायगड जिल्हा महाराष्ट्राचा ऐतिहासिक जिल्हा आहे त्यामुळे या ठिकाणी शिक्षण क्षेत्रात काम करण्याची अधिक गरज असल्याची नोंद एन. डी. पाटील यांनी घेतली आणि त्या अनुषंगाने रायगड जिल्हयात ३७ च्या आसपास शाखा उभारण्यात संस्था यशस्वी झाली आणि याचे श्रेय एन. डी . पाटील यांना द्यावे लागेल. त्या नंतरच्या काळात दि. बा. पाटील आणि अन्य सहकाऱ्यांची यामध्ये मेहनत आहे. शिक्षणाचे वजन मोठे असते. त्यामुळे शिक्षण आणि आत्मविश्वासाने ज्ञानार्जन करण्याची गरज लक्षात घेऊन संस्थेने कात टाकली असून त्यानुसार आधुनिक शिक्षणाची कास धरली आहे, असे अधोरेखित करून संस्थेतील सहकाऱ्यांना धन्यवाद दिले.

कर्मवीर अण्णांच्या स्वप्नांना साकार करण्यासाठी रयत शिक्षण संस्थेला १०० कोटी रुपयांपेक्षा जास्त रुपयांची देणगी देणारे संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ रामशेठ ठाकूर यांनी आपले विचार मांडताना कर्मवीर अण्णांच्या कार्याला उजाळा दिला. कर्मवीर अण्णांनी रयत शिक्षण संस्था उभारली या संस्थेच्या ७५० शाखा झाल्या आहेत. कर्मवीर अण्णांनी जी मुहूर्तमेढ रोवली आणि त्यातून त्यांनी खेडोपाड्यात अत्यंत दुर्गम भागात जाऊन शाखा उभारण्याचे काम केले आणि त्या मेहनतीने वाढवल्या. आजच्या काळात आपल्याला बऱ्याचशा सुखसुविधा मिळतात आपल्याला विशेष प्रयत्न करावे लागत नाही आणि सहकार्य मिळते, पण त्या काळात असे काहीही नसताना मेहनत घेऊन त्यांनी संस्था वाढवली आणि शरद पवारसाहेब जेव्हा संस्थेचे अध्यक्ष झाले तेव्हापासून या संस्थेने अतिशय जोमाने सर्व क्षेत्रात प्रगतीच्या बाबतीत यशस्वीपणे पाऊले टाकली. पवारसाहेब महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात काम करत असताना शिक्षण आणि संस्थेच्या विकासासाठी कायम लक्ष देत असतात आणि त्या अनुषंगाने त्यांनी अनेक प्रयोग संस्थेमध्ये घडवून आणतात. शिक्षणाच्या दृष्टीने सात आठ वर्षांपूर्वी पुण्यामध्ये अशाच प्रकारे 'थिंक टँक' नावाने एक प्रकल्प सुरु केला. त्यामध्ये शास्त्रज्ञ श्री. माशेलकर, सरकारी अधिकारी व विचारवंताची एक परिषद घेतली आणि त्या अनुषंगाने आता संस्थेला इंग्रजी माध्यमाकडे वळले पाहिजे तर सुप्रिया सुळे यांनी सीबीएसईकडे कळ दिला पाहिजे अशी सूचना केली आणि त्या दृष्टिकोनातून हि पाऊले उचलायला सुरुवात झाली आणि आता संस्थेच्या अनेक शाखांमध्ये सीबीएसई अभ्यासक्रम सुरू झाला आहे. आज जी. आर. पाटील यांनी इंग्रजी माध्यमाची प्री प्रायमरी स्कूल सुरू केले आहे ही अतिशय चांगली गोष्ट आहे. आधुनिकरणाच्या युगात जग जवळ आला आहे. मराठी भाषेचा आपल्या प्रत्येकाला अभिमान असलाच पाहिजे. जागतिक स्तरावर काम करायचे असेल तर इंग्रजी भाषा आत्मसात केली पाहिजे. जी. आर. पाटील व्यक्ती सर्वांना माहिती आहे. गप्प बसणारा माणूस नाही एकदा कामाला लागला कि अफाट पळतो. संस्थेच्या कामाला गेले असताना अपघात झाला होता आणि बरेच दिवस अंथरुणाला होता, पण गाडी थांबली नाही परत धावपळ त्यांनी केली आणि शंभर ठिकाणी जाऊन देणगी घेतली पण त्यांना कुणीही नाही म्हणू शकले नाही. यापूर्वीची इमारत बांधताना या ठिकाणी साधी पाण्याची टाकी कुठे बसवायची, असा प्रश्न होता मात्र तशा परिस्थितीतही इमारत उभारली आणि त्या इमारतीसाठी मला ५० लाख रुपये मदत करता आली आणि त्याच अनुषंगाने आताची आणखी नवीन इमारत बांधताना मेहनत जी. आर. पाटील यानी घेतली आहे, असेही नमूद करत विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी सतत काम करत राहू या, असे आवाहनही लोकनेते रामशेठ रामशेठ ठाकूर यांनी केले. या वेळी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांचेही भाषण झाले.

**'लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी वावंजे हायस्कुलला पुनर्जीवित केले'**

प्रास्ताविक स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन जी. आर. पाटील यांनी केले. ते म्हणाले की, माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी मला ५० लाख रुपयांची आर्थिक मदत केली त्यामुळे ही भव्य इमारत उभी राहिली त्यामुळे खऱ्या अर्थाने वावंजे हायस्कुलला पुनर्जीवित करण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले असल्याचेही जी. आर. पाटील त्यांनी सांगितले तसेच खासदार असतानाही त्यांनी खासदार निधी दिल्याची आठवणही पाटील यांनी काढली.

## लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयात रयत माऊलीला अभिवादन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे कामोठे येथील लोकनेते दि.बा. पाटील विद्यालयात रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांची पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा रायगड विभागीय अधिकारी श्री कोंगेरे साहेब यांच्या हस्ते रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर विद्यालयातील सेजल पाटील, शर्वरी शेंडगे यांनी लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या कार्याची माहिती दिली.

विद्यालयातील पेरवी सर यांनी विविध प्रसंगातून रयत माऊलींचा जीवन प्रवास सांगितला. मुख्याध्यापक कोंगेरे यांनी लक्ष्मीबाई पाटील यांनी केलेल्या विविध त्यागाची माहिती दिली.

विद्यालयाकडून सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आली. या कार्यक्रमाचे निवेदन निकिता म्हेत्रे आणि आभार श्रेया चव्हाण या विद्यार्थिनीने मानले.



## पनवेलमध्ये सिग्नल यंत्रणेवरील मराठी सूचनांच्या उपक्रमांचे कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेने मराठी बाणा जागा करीत सायन पनवेल महामार्गावरील पंचमुखी चौकातील सिग्नल यंत्रणा देवनागरीत कार्यान्वित केली आहे. सिग्नल वर थांबल्यावर बोर्डवर देवनागरीत आकडे वाहन चालकांना दिसतात तसेच या बॉर्डवर थांबा, जा असे मराठी वाहन चालकांचे आकर्षणाचे केंद्रबिंदू ठरले आहे. प्रायोगिक तत्वावर पालिकेने हा उपक्रम राबविला असल्याची माहिती पनवेल महानगरपालिकेचे विद्युत विभागाचे अभियंता प्रीतम पाटील यांनी सांगितले.




या उपक्रमाचे मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. मराठी ही राज्याची अधिकृत भाषा आहे. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम नुसार शासकीय कामकाज टक्के मराठी भाषेतून करणे आवश्यक असून त्यासाठी सर्व विभागांनी मराठी भाषेच्या प्रचार प्रसारासाठी विविध उपक्रम राबवत अधिक प्रयत्न करावेत अशा सूचना आहेत.

## कळंबोलीत आज नववर्ष शोभायात्रा

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**



गुढीपाडवा सामाजिक व सांस्कृतिक सेवा संस्था कळंबोली यांच्या वतीने कळंबोली शहरांमध्ये भव्य दिव्य शोभायात्रेचे आयोजन रविवारी (दि.३०) सकाळी ठीक ८ वाजता गुढीपूजनानंतर करण्यात आले आहे.

शोभायात्रेमध्ये विविध शाळा व सामाजिक सांस्कृतिक सेवा मंडळ तसेच धार्मिक व अध्यात्मिक सेवा मंडळ सहभागी होणार आहेत. ढोल पथक, लेझीम पथक यांचे वादन व जुन्या पारंपारिक खेळाचे प्रदर्शन सुद्धा केले जाणार आहे. शोभायात्रा कळंबोली शहरात फिरून आल्यानंतर मंगलेश्वरी माता मंदिराजवळ सर्व सहभागी संस्था, शाळा व मंडळे तसेच प्रमुख पाहुणे यांचा सत्कार केला जातो.

या मंडळाचे अध्यक्ष शहाजी धुमाळ, सचिव उद्धव कदम खजिनदार, विजय सावंत, सदस्य बबन बारगजे, शरद वाडीकर, महादेव जाधव, संजय भोंडवे, दत्ता गडाख, प्रदीप फडतरे, मयूर गार्डे, माणिकराव पवार, मोरेश्वर चौधरी बाळासाहेब जगताप सचिन मुळीक पोपट धुमाळ महेश पाटील संजय पासलकर, रघुनाथ जूनगारे केशव पडवळ आदींनी शोभा यात्रेमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

दरम्यान, पनवेल, कामोठे, खारघरमध्येही भव्य स्वागत यात्रा होणार आहे. पनवेल शहरातील नववर्ष स्वागत समिती पनवेल यांच्या वतीने श्री वीरूपाक्ष मंगल कार्यालयासमोरील अशोक बाग येथून गुढीपाडवा निमित्त भव्य शोभा यात्रेला सुरुवात होणार आहे शहरातील स्वातंत्र्यवीर सावरकर चौकात या शोभायात्रेचा समारोप होईल.

## पोलीस असल्याचे भासवून केले लग्न; गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस दलात असल्याचे खोटे भासवून लग्न जुळवून घेतले. त्यानंतर सासूचे १२ तोळे दागिनेही खासगी सावकाराकडे गहाण ठेवून पती, सासू आणि सासरा यांनी फसवणूक केल्याची फिर्याद विवाहितेने कळंबोली पोलीस ठाण्यात केली आहे.

आरोपी सातारा जिल्ह्यातील कोरेगावच्या बिचुकले तालुक्यातील आहेत. सध्या त्यांचे वास्तव्य कळंबोलीत आहे. तक्रारदार विवाहितेचे पती आरोपी राहुल रामचंद्र सपकाळ, सासरे रामचंद्र आंनदराव सपकाळ आणि सासू सुवर्णा रामचंद्र सपकाळ यांनी २०२१पासून कालपर्यंत पीडितेचा शारीरिक व मानसिक त्रास दिल्याचे म्हटले आहे. याशिवाय फिर्यादीच्या आईचे साडेपाच लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने आरोपींकडे विश्वासाने ठेवण्यासाठी दिले असता त्यांनी खासगी सावकाराकडे गहाण टाकले असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

कळंबोली पोलीस तपास करीत असून आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गोळी झाडून खुन करणाऱ्यास अटक

**पनवेल** : शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावाजवळील मोकळ्या जागेमध्ये नवीन घराचे बांधकाम चालू असलेल्या ठिकाणी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरुन एकास बंदुकीची गोळी मारुन त्याचा खुन केला होता. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी एका आरोपीस अटक केली आहे.

गराडा गावाजवळील मोकळ्या जागेमध्ये नवीन घराचे बांधकाम चालु असलेल्या ठिकाणी कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणाने बाबुराव वाघमारे, वय अंदाजे ४७ वर्षे यांना बंदुकीने गोळी मारुन त्यांचा खून केला आहे. म्हणून पनवेल शहर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता.


Dr. B. J. BIRMOLE
MS., M.Ch., D.N.B.
PAEDIATRIC SURGEON



HAPPY GUDI PADWA


PANVEL :
BIRMOLE HOSPITAL
2. Vastu Apt. Thana Naka,
Panvel-410206, Dist Raigad.
Tel. 27455486, 27480547
Mon. to Sat. - 11 a.m. to 2 p. m.

VASHI :
MORALWAR CHILD CARE
310, Nariman Vyapar Kendra,
Above Navratna Hotel, Sec. 17, Vashi.
Tel . : 55911009, 27890462
Tue. & Fri. - 5 p.m. to 7 p.m.

HONORARY : MGM Hospital (Vashi) : 27822203, 27821659
Paramount Hospital (Panvel) : 2745 5610, 2745 3825
Email : drbjbirmole@hotmail.com
Resi. : 27454759

Purohit Clinic
Accident & Maternity Home

- NABH accredited, ISO certified Nursing home
- Treating Patients from 1986
- Well equipped hospital for trauma care & orthopaedics.
- Knee & Shoulder Arthroscopy
- Hip Replacement, Knee Replacement Surgeries.
- Spine Surgery
- Major Fractures & Disabilities
- Obstetrics & Gynaecology
- Infertility, Laparoscopy
- State of Art Operation Theatres with modular & complete stainless Steel Opration Theatre
- On panel of all major insurance providers
- Fully equipped Physiotherapy Unit
- Digital & Portable X-Ray Units


Dr. Deepak Purohit
M.S. (Orthopaedic)


Dr. Veena Purohit
M.D. (Gynacologist)


Dr. Mandar Purohit
M.S. (Orthopaedic)


Dr. Deepti Purohit
M.S. (Ophthalmalogist)

Purohit Clinic
Accident & Maternity Home

- Cataract Surgery
- Computerized eye testing
- Diabetic Eye Care
- Retina Clinic
- Glaucoma treatment
- Squint surgery
- Cornea Clinic
- Pterygium surgery
- Contact Lens Clinic
- Joint Replacement
- Arthroscopy
- Fractures & Accidents
- Back Pain
- Spine surgery
- Physiotherapy
- Digital X-Rays

PUROHIT CLINIC Plot 78, MCCH Society, PANVEL - 410 206 022-2745 2922/2745 0501 Cell: +91 84220 24807 email: purohitclinic@gmail.com

PUROHIT HOSPITAL Sector 16, Above Federal Bank, Kamothe - 410 206. 022-2743 0659 Cell: +91 98197 50771/94226 19424 email: deeptiparanjpe912@gmail.com


We treat with care & compassion...

जीवेत् शरद: शतम्!
विक्रम खुटले
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
भूषण भोईर




जीवेत् शरद: शतम्!
सचिन ठाकूर
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
संतोष भगत




Happy
Gudi Padwa
May the Gudi Padwa festivities fill your
home with warmth and positivity.
WITH BEST COMPLIMENTS FROM
tpv
Thakkar Popatlal Velji Sales Ltd.
Authorised Cement Distributor
Off. No. 2, Neel Presidency, 1st Flr., Opp. M.T.N.L., M.C.C.H. Society,
Panvel. 410206. Raigad. Maharashtra, india
Sales : + 91-22-27453346. Fax. + 91 - 22 - 27468124.
Email. : tpvmumbai@gmail.com Web : www.thakkarcement.com.


गुढी सजली घरोघरी,
कलशाला तेज देई पितांबरी!
गुढी पाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा
Pitambari
Shining Powder
Pleasant Fragrance
THE ORIGINAL & NO. 1 BRAND
पितांबरी शायनिंग पावडर
लख्ख पूजा सामग्रीसाठी
METAL POLISH LIQUID
पितांबरीचे नवे उत्पादन
सादर आहे मेटल पॉलिश
धातूंना देई दीर्घकाळ टिकणारी चमक!
• धातूंवरील डाग आणि गंज दूर करते
• लहान गॅप्स आणि कोपरे चमकवते
• घरगुती तसेच औद्योगिक वापरातील धातूंसाठी उपयुक्त
* खाद्यपदार्थांसाठी वापरल्या जाणाऱ्या भांड्यांवर उपयोग करु नये.
पितांबरी होमकेअर डिव्हिजन
Pitambari Products Pvt. Ltd.: Contact - 8451907123, 8652182530. CRM: 022 - 67035564/ 5699, Toll Free: 18001031299. CIN: U52291MH1989PTC051314
SCAN TO SHOP


Singapore's
LUXURY LIFE EXPERIENCE
CLOSEST TOWNSHIP TO MTHL & NAVI MUMBAI INTERNATIONAL AIRPORT
NEW TOWER SENTOSA
HAPPY Gudi Padwa
CLUB VEGAS
PHASE 1 - READY POSSESSION
SAI WORLD CITY PANVEL
PROJECT HALLMARKS
38 Acre Mega Township | G+33 Storeyed Towers | 2, 2.5, 3 & 4 BHK Luxury Homes
Themed Landscaping | 50,000 Sq.Ft. Club Vegas | World–class Amenities
LOCATION ADVANTAGES: Navi Mumbai International Airport - 5 Mins. | Mumbai- Pune Expressway - 2 Mins
Delhi Public School (DPS) - 5 Mins | Mumbai Trans Harbour Link - 10 Mins | Panvel Railway Station - 7 Mins
Jawaharlal Nehru Port Trust (JNPT) - 20 Mins | Close proximity to Schools, Malls, Hotels and Banks - 5 Mins
98330 90000 | enquiry@paradisegroup.co.in www.paradisegroup.co.in
Site & Sales Off.: Sai World City, Palaspe Phata Junction, Panvel - 410 206
Corp. Off.: 1701, Satra Plaza, Plot No. 19 & 20, Sector - 19D, Vashi, Navi Mumbai - 400 705
PARADISE® GROUP
Your World. Our Vision.
ISO - 9001: 2015 Certified Organization
SCAN QR CODE FOR PROJECTS' DETAILS
MAHARERA NO. PHASE I - P52000006318 | PHASE II - P52000022708 | PHASE III - P52000053727, https://maharera.mahaonline.gov.in
Disclaimer: All the specifcation, design, facilities, dimensions, etc. are subject to the approval of the respective authorities & developers and would be changed if necessary. The discretion remains with the developers.


चैत्राची सोनेरी पहाट,
नवा आरंभ नवा विश्वास,
नव्या वर्षाची हीच खरी सुरुवात..!
नववर्ष आणि गुढी पाडवा
निमित्त
सर्वांना मंगलमय
शुभेच्छा!
Best wishes from
AIS
Asahi India Glass Ltd.

# अमानुष ५० वर्ष

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

प्रेमभंग झालेला नायक कमालीचा व्यथित झाल्याने एकच प्याला हाती करतो, आपले सगळेच दु:ख त्या दारूच्या ग्लासात ओततो. आपण निर्दोष आहोत, आपलं तिच्यावरचं प्रेम अतूट आहे, खरं आहे, तिने आपल्याला समजून घ्यावे अशी तो मनोमन विनवणी करतो. दारुच्या व्यसनापायी तो देवदास बनतो....

कृष्ण धवल अर्थात ब्लॅक अँड व्हाईट चित्रपटापासून रंगीत चित्रपटापर्यंत अनेकदा तरी असा प्रेमभंग झालेला नायक रुपेरी पडद्यावर आला, एकादा प्रेमभंग झालेला नायक योगायोगाने चक्क कोठीवरही पोहचला. त्याच्या या दु:खाने चित्रपटगृहाच्या अंधारातील प्रेक्षक गलबलला. त्याच्यावर अशी दुर्दैवी वेळ यायला नको होती असे त्यांना वाटले आणि असे प्रेमात अपयशी ठरलेल्या नायकांचे अनेक चित्रपट लोकप्रिय ठरले.. दिलीपकुमार तर त्यातून ट्रॅजेडी किंग म्हणून नावाजला. एक सुपरहिट फॉर्मुला बरेच काही घडवतो.

अमानुषदेखील सुपरहिट

शक्ती सामंता निर्मित व दिग्दर्शित अमानुष एकाच वेळेस बंगाली व हिंदी भाषेत निर्माण झाला. बंगाली भाषेतील अमानुष १९७४ च्या दुर्गा पुजेच्या वेळेस पूर्व बंगालमध्ये प्रदर्शित झाला आणि रसिक प्रेक्षकांनी बघता बघता तो लोकप्रिय झाला. कोलकत्ता शहरातील चित्रपटगृहात त्याने तब्बल ९६ आठवडे मुक्काम केला. चित्रपटगृहाशी असलेला शक्ती फिल्म्सचा करार संपुष्टात आल्याने तो चित्रपटगृहातून उतरवण्यात आला. अन्यथा शतक निश्चित होते.

बंगाली अमानुष हाऊसफुल्ल गर्दीत सुरू असतानाच हिंदीतील अमानुष २१ मार्च १९७५ रोजी मुंबईत प्रदर्शित झाला. मुंबईत मेन थिएटर मिनर्व्हा मॅटीनी शो आणि लिबर्टी (दिवसा तीन खेळ) व इतरत्र प्रदर्शित झाला. (त्याला पन्नास वर्ष पूर्ण झालीदेखिल यानिमित्त हा फोकस). हिंदीतदेखिल अमानुष लोकप्रिय ठरला.


उत्तमकुमार हा बंगाली चित्रपटातील दिलीपकुमार म्हणून ओळखला जाई. अष्टपैलू लोकप्रिय अभिनेता. साठच्या दशकात त्याने हिंदीत टाकलेले पाऊल अपयशी ठरले. आता दिग्दर्शक शक्ती सामंता यांनी त्याला हिंदीत पुन्हा संधी दिली. त्या संधीचा त्याने योग्य वापर केला. एक तर त्याचीच गरज असते आणि दुसरे म्हणजे तशी दमदार व्यक्तिरेखाही मिळावी लागते.

शक्ती सामंता व शर्मिला टागोर ही दिग्दर्शक व कलाकार अशी जमलेली जोडी. दोघेही मुळचे बंगालचे. शक्तीदा यांनीच कश्मीर की कली तून शर्मिला टागोरला हिंदी चित्रपटाच्या रुपेरी पडद्यावर आणले. त्याच शक्ती सामंता यांनी न इव्हिनिंग इन पॅरीस मध्ये याच शर्मिला टागोरला पॅरीसच्या उत्फूर्त अशा समुद्रात बेदींग सूटात दाखवले (एका प्रख्यात इंग्लिश मासिकाच्या मुखपृष्ठावर शर्मिला टागोरचे असे रुपडे प्रसिद्ध होताच जणू सांस्कृतिक धक्काच बसला. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीसमोर असं म्हणजे किरकोळ गोष्ट.) टीकाटिप्पणीच्या उलटसुलट वादळातून बाहेर पडण्याचा मार्ग असतो तो रुपेरी पडद्यावरील परफॉर्मन्स. शर्मिला टागोरने ते साध्य केले त्यात एक चित्रपट होता, शक्ती सामंता दिग्दर्शित आराधना (१९६९), मग अमर प्रेम (१९७२). या जोडीचे चरित्रहीन, आनंद आश्रम इत्यादी चित्रपटही आले. अमानुष हा चित्रपट शक्तीपदा राजगुरु यांच्या नया बसन या साहित्यवार आधारित (पूर्वी मराठी व बंगालीत मोठ्याच प्रमाणावर साहित्यवार आधारित चित्रपट निर्माण होत. त्यावरूनचे पटकथा लेखन जास्त महत्वाची गोष्ट. शब्द माध्यमातून दृश्य माध्यमात जाणे.) संवादलेखन













प्रभात रॉय यांचे. छायाचित्रण आलोक दासगुप्ता यांचे.

बंगालमधील समुद्र किनाऱ्यावरील एका छोट्याश्या हिरव्यागार गावात घडणारी ही गोष्ट. मधुसूदन अर्थात मधुरॉय चौधरी (उत्तमकुमार) व लेखा (शर्मिला टागोर) यांच्या प्रेमसंबंधात एक विचित्र विघ्न येते. मधु रॉयने दारुच्या नशेत आपल्याशी केलेल्या बळजबरीतून आपण गर्भवती राहिल्याचा आरोप गावातीलच एक युवती मातों उर्फ धन्नो (प्रेमा नारायण) करते आणि मधु व लेखा यांच्या प्रेमसंबंधात मोठेच विघ्न येते. सगळीच घडी विस्कटून जाते. मधु पूर्णपणे दारुच्या आहारी जातो तर लेखा प्रचंड हवालदिल होते. धन्नो गावातून गायब झालेली असते. चित्रपट क्लायमॅक्सकडे जाताना सगळेच गैरसमज दूर होतात. सत्य काय ते समोर येते. चित्रपटात डॉक्टर, पोलीस इन्स्पेक्टर अशा अनेक लहान मोठ्या व्यक्तीरेखा आहेत. अनिल चटर्जी, उत्पल दत्त, मनमोहन, असित सेन, माणिक दत्त, मदन

## दिल ऐसा किसीने मेरा तोडा....

घोष, सुबर्तो महापात्रा, अमोल सेन, प्रभात रॉय इत्यादींच्या भूमिका. गावाचा परिसर, होडीतून प्रवास, संथ जीवनशैली हे सगळेच कथेला पूरक आणि चित्रपटाला वेगळ्याच वातावरणात नेणारे.

उत्तमकुमारभोवती सगळा चित्रपट आहे आणि तसे भान ठेवत त्याने आपले काम केलेय. विशेषत: प्रेमभंग झाल्यानंतरची उदासीनता त्याने उत्तम साकारलीय. तोच या चित्रपटाचा गाभा आहे. इंदिवर यांच्या गीतांना श्यामल मित्रा यांचे संगीत ही या चित्रपटाची मोठीच जमेची बाजू. पटकथेनुसार ती आहेत. त्यामुळे चित्रपटातील आपली उत्सुकता कायम राहते. तेरे गालो को चुमू (पार्श्वगायक किशोरकुमार व आशा भोसले), दिल ऐसा किसीने मेरा तोडा (किशोरकुमार), गम की दवा तो प्यार है (आशा भोसले), ना पुछे कोई हमें (किशोरकुमार), कल के अपने ना जाने (आशा भोसले) ही गाणी लोकप्रिय ठरली.

एका भाषेतील सुपरहिट चित्रपटाची अन्य भाषेत रिमेक तर होणारच. यशाला फॉलो करणे ही तर चित्रपटसृष्टीची परंपरा. अमानुषची तेलगू, तमिळ, मल्याळम या तीनही भाषेत रिमेक झाली. प्रेमभंगापायी दारुच्या ग्लासात स्वतःला झोकून देणारा नायक हे कथासूत्र त्या काळात रसिकांनी पाहताना नायकाला सहानुभूती दाखवली. आज तशी व तेवढीच सहानुभूती मिळेल का हा बदलत्या सामाजिक सांस्कृतिक स्थितीनुसार प्रश्नच तर आहे.

उत्तमकुमार हिंदीत फारसा रुळलाच नाही. बहुतेक बंगाली चित्रपटसृष्टीतील वातावरण, कामाची पद्धत, मिळालेल्या भूमिका, तिकडच्या चित्रपटसृष्टीतील स्थान या गोष्टींच्या तुलनेत हिंदीत त्याला परकेपण वाटले असेल. एका ठिकाणचे रुजणे दुसरीकडे रुजेलच असे नाही. १९६७ साली अग्रदूत दिग्दर्शित छोटी सी मुलाकात या चित्रपटात वैजयंतीमालाचा नायक म्हणून त्याने हिंदी चित्रपटसृष्टीत पाऊल टाकले, त्यात यश न आल्याने बंगालीवरच त्याने आपला फोकस कायम ठेवला.

काही वर्षांनी शक्ती सामंता यांनी अमानुष साठी तोच योग्य असे मानवत त्याचे हिंदीत पुनरागमन केले. अर्थात, हा चित्रपट एकाच वेळेस बंगाली व हिंदीत निर्माण झाल्याचेही उत्तमकुमारच्या पथ्यावर पडले. आणि पिक्चर सुपर हिट म्हटल्यावर हिंदीत आणखीन ऑफर येणारच. त्यात शक्ती सामंता दिग्दर्शित आनंद आश्रम, गुलजार दिग्दर्शित किताब, ए. भीमसेन दिग्दर्शित दूरिया असे काही स्वच्छ मनोरंजक चित्रपट मिळाले. तर

मनमोहन देसाई दिग्दर्शित देशद्रोही मध्ये अमिताभ बच्चनसोबत संधी तर मिळाली पण चित्रपट निर्मितीवस्थेत असा व इतका काही रखडला की या दोघांना एकाच चित्रपटात पाहण्याची उत्सुकताच संपली. उत्तमकुमारने आणखीन काही हिंदी चित्रपटातून काम केल्यावर बंगाली चित्रपट हीच आपली कर्मभूमी ठरवली आणि तेथे अधिकाधिक प्रमाणात तो यशस्वी ठरला.

....पन्नास वर्षांनंतर अमानुष त्यातील गाण्यांनी आजही आपल्या समोरच आहे. चित्रपटातील गाण्यांची जागा पटकथेनुसार असेल आणि ती गाणी श्रवणीय असतील तर तो चित्रपट कधीच पडद्याआड जात नाही, हेदेखील यशच. अशी गाणी अलिकडच्या चित्रपटातून फारशी पाह्यला/ ऐकायला मिळतात का हो? दर्जेदार गीत संगीताने चित्रपटाचे आयुष्य वाढते. हे कान देऊन ऐका.

# श्रीवर्धन बसस्थानकात प्रवाशांना करावा लागतोय समस्यांचा सामना

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन बस स्थानकावरुन नियमितपणे गाड्या वेळेवर सुटत नाहीत आणि गाड्यांच्या देखभाली कडे लक्ष नसल्याने काही वेळा गाड्या रस्त्यात बंद पडत आहेत. अनेक गाड्यांमध्ये खिडक्यांची दुरवस्था आहे, तसेच आसनांवरील दिवे नादुरुस्त आहेत. त्यामुळे प्रवाश्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.





श्रीवर्धन आगाराची स्थापना १९७४ साली बॅरिस्टर ए.आर.अंतुले यांच्या कारकीर्दीत झाली. १९८७ साली आराठी ग्रामपंचायतीच्या हद्दीत अत्याधुनिक श्रीवर्धन बसस्थानक उभारण्यात आले, जेव्हा स्व. विलासराव देशमुख यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा पार पडला. त्यापूर्वी, श्रीवर्धन बाजारपेठेतील बसस्थानक जेमतेम दोन गाड्या उभ्या राहू शकत होत्या आणि ते अत्यंत अपुरे होते.

श्रीवर्धन आगारातून लांब, मध्यम लांब पल्ल्याच्या व ग्रामीण भागातील अनेक फेऱ्या सुरू होत्या. मात्र, कोविड-१९ नंतर प्रवाशांची सुरक्षा लक्षात घेत बससेवा बंद करण्यात आली. त्यानंतर, प्रवाश्यांच्या कमी संख्येमुळे अनेक बस फेऱ्या कायमस्वरूपी बंद केल्या गेल्या आहेत

गाड्यांच्या देखभालीतही गंभीर कमतरता दिसून येत आहे. अनेक गाड्यांमध्ये खिडक्यांची दुरवस्था आहे, तसेच आसनांवरील दिवे नादुरुस्त आहेत. काही गाड्यांची चाके निखळल्याच्या घटना घडल्या. शिवशाही गाड्यांमध्ये वातानुकूलित यंत्रणा काम न करणे, पुश-पुल आसनांची खराब अवस्था आणि मोबाईल चार्जिंग सॉकेट्स निघालेली असण्याचेही अनेक उदाहरणे आहेत.

श्रीवर्धन आगाराच्या दुरवस्थेमुळे प्रवाशांना गंभीर अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाने या समस्यांकडे त्वरित लक्ष देऊन योग्य उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. यात बस स्थानकाच्या देखभाल सुधारण्यापासून गाड्यांच्या नियमित देखभालीपर्यंत सर्व बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे, जेणेकरून प्रवाशांना सुरक्षित, आरामदायक आणि वेळेवर सेवा मिळू शकेल.

प्रवाश्यांच्या सुरक्षिततेसाठी, वेळेवर सेवा मिळविण्यासाठी आणि गाड्यांची दुरवस्था रोखण्यासाठी त्वरित वरिष्ठांकडून दखल घेतली जावी, अशी प्रवाश्यांचा आग्रह आहे

# पनवेल महापालिकेतर्फे हवामानातील बदलावर परिसंवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत पर्यावरण संवर्धन व संरक्षण याचे महत्व महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये बिंबवण्यासाठी नुकतेच एमजीएम इन्स्टिट्यूटच्या प्रोस्थेटिक्स अँड ऑर्थोटिक्स विभागामध्ये 'हवामानातील बदल' या विषयावरती परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.





पर्यावरणाचे महत्त्व शालेय विद्यार्थ्यांना व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना समजावे यासाठी उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या सूचनेनूसार महापालिकेच्यावतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत स्वच्छ भारत अभियान व आकाश, जल, वायू, भूमी, अग्नि या माझी वसुंधरा अभियानातील महत्वाच्या घटकांनूसार नुकतेच महापालिका व एमजीएम इन्स्टिट्यूटच्या प्रोस्थेटिक्स अँड ऑर्थोटिक्स विभाग यांच्यावतीने परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.

या वेळी पर्यावरणाविषयी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी यासाठी ग्लोबल वॉर्मिंग, कार्बन फूटप्रिंट कमी करणे, हवामानाचे बदलाचे होणारे परिणाम व त्यावरील उपाय योजना अशा विविध विषयांवरती या परिसंवादात चर्चा करण्यात आली.

# रसायनीत विद्यार्थ्यांनी केले दशावताराचे सादरीकरण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्यक्रम विभाग, सांस्कृतिक, कार्य संचालनालयाच्या वतीने रिस मोहोपाडा येथे प्रशिक्षण शिबीराचा समारोप नुकताच झाला. शिबीर प्रमुख गौतम कदम, पवन वालावलकर, शंकर वारंग आणि, उमेश धुरी प्रस्तुत ओम वीरभद्र दशावतार नाट्य मंडळ भांडुप मुंबई यांच्यामार्फत रायगड जिल्ह्यामध्ये प्रथमच दहा दिवसांचे दशावतार शिबीर उत्तमरित्या पार पाडले.



शिबीर समारोपाच्या दिवशी भांडुपच्या ओम वीरभद्र दशावतार नाट्य मंडळ मुंबई मधीत कलाकारांनी मिळून ९८ रूई महात्म या दशावतारी नाटकाचे उत्कृष्ट सादर केले. त्यावेळी उपस्थित दशावतारी नाटकाचा कलाप्रेमीनी स्वागत केले.या समारोप्रसंगी सरपंच उमाताई संदिप मुंढे,ग्रामपंचायत सदस्या रसिका राकेश खराडे,सदस्य केदार भोईर,रोटरी क्लबच्या शारदा काळे ,माजी सभापती रमेश पाटील,सामाजिक कार्यकर्ते मंगेश पाटील, निवास काणे,संजय पेडणेकर शिक्षक पुरूषोत्तम मागी बंडू आणि चंद्रकांत पास्ते, ओम वीरभद्र दशावतार नाट्य मंडळाचे मालक प्रविण धुरी आणि संचालक उमेश धुरी उपस्थित होते.

सरपंच उमाताई मुंढे यांनी महाराष्ट्र शासन सांस्कृतिक विभाग मंत्री अ‍ॅड्.आशिष शेलार,विकास खारगे , मुख्य सचिव सांस्कृतिक कार्य विभाग झाणि आणि अपर विभीषण चवरे सानू संचालक यांचे आभार मानले. महाराष्ट्र शासनच्यावतीने राज्यातील लोककला,लोक परंपरा व लोकसंस्कृतीचे जतन व संवर्धन व्हावे तसेच नवीन पिढीला आपल्या उच्च संस्कृतीची व परंपरेची ओळख होण्यासाठी कोकणातील दशावताराचे शिबिर रायगड जिल्ह्यात प्रथमच आयोजित केले होते. विद्यार्थी कलाकारांनी समारोपादिवशी दशावतारा तीन वेगवगळ्या भूमिका म्हणजे इंद्रदेव, नारद, विष्णू, भीम, रंभा, राजा ममुरखज ब्राम्हण, राजपूत अशा भूमिका रंगभूषा, वेशभूषा करून उत्तमरित्या सादरीकरन करुन दशावतार नाट्यप्रेमींना मंत्रमुग्ध केले.यावेळी सर्व रसिक प्रेसकांनी विद्यार्थी कलाकारांचे आणि प्रशिक्षकांचे कौतुक केले.

## मध्य रेल्वेच्या विभागीय सल्लागार समितीवर नितीन परमार

**कर्जत : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या विभागीय सल्लागार समिती (ZRUCC) सदस्य पदी नितीन सोहनलाल परमार यांची निवड करण्यात आली आहे. यापूर्वी सुद्धा त्यांनी हे पद सांभाळून रेल्वे प्रवाशांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला होता.

राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांनी केलेल्या विनंती ला मान देऊन रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी नितीन परमार यांची विशेष प्रतिनिधी म्हणून निवड केली आहे. ही समिती महाराष्ट्र, कर्नाटक व मध्यप्रदेश या राज्यातील रेल्वे स्थानकात कार्यक्षेत्रात पुरती मर्यादित राहणार आहे.

या समितीचे मुख्य काम हे रेल्वे प्रवाशांना ज्या सुविधा देत आहेत त्या सुविधा बरोबर आहेत की नाही याचे निरीक्षणकरुन कमतरता असेल तर रेल्वे प्रशासनाला याची माहिती देऊन काम करून घेणे

# हाळ गावातील अवैध कत्तलखाना उद्ध्वस्त

## हिंदू संघटनांनी केले स्वागत

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील हाळ गांव,हाळ खुर्द,बुद्रुक या तिन्ही गावातील अवैध कत्तलखाने खालापूर पोलिसांनी उद्ध्वस्त केले आहेत. ही कारवाई करताना तिन्ही हाळ गावातील नागरिकांनी सहकार्य केल्याबद्दल खालापूर पोलिस निरिक्षक सचिन पवार यांनी कौतुक केले आहे तर खालापूर पोलिसांच्या मोठ्या कारवाईचे स्वागत होत आहे.



होळी सणाची तयारी सुरू असताना, खालापूर पोलीस ठाण्याचे हद्दीत गोहत्या केल्याची घटना घडली होती.यादरम्यान गोरक्षक आणि मुस्लिम महिला आणि गावकरी यांच्यात दगडफेक झाली दगडफेकीत दोन गोरक्षक जखमी झाले होते यामुळे खालापूर तालुक्यात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

त्यानंतर पोलिसांनी बारा जणांना अटक केले होते. गोवंश हत्याबंदी असतानाही अवैधरित्या गोवंशीय प्राण्यांची कत्तल करून नये यासाठी खालापूर उपविभागीय पोलिस अधिकारी विक्रम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरिक्षक सचिन पवार यांनी आपल्या पोलिस अधिकारी यांच्यासह हाळ गाव,हाळ खुर्द,बुद्रुक गावात जावून लोकांचे प्रबोधन केले त्यानंतर गावऱ्यांच्या मदतीने मुस्तकीन रशीद पटेल राहणार हाळ बुद्रुक, रियाज कादिर जळगावकर, जावेद लियाकत सोंडे राहणार हाळ बुद्रुक, सईद धतुरे राहणार मधले हाळ, मुजिब हयात जळगावकर रा.हाळ बुद्रुक यांच्या घराशेजारचे गाई गोठा, अनधिकृत बांधलेले पत्राचे शेड नष्ट केले आहे.

तिन्ही हाळ गावातील अवैध कत्तलखाने असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.याबाबत खालापूर तहसिलदार, गटविकास अधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार केले होते. गोवंश हत्याबंदी असतानाही गोवंशीय प्राण्यांची कत्तल करून दोन धर्मात तेढ निर्माण होवू नये यासाठी हाळ गावामध्ये जनजागृती केली. या वेळी गावातील नागरिकांनी स्वतःहून पुढाकार घेत गावातील अवैध कत्तलखाने नष्ट करण्यासाठी मदत केली.

# रायगडावरील 'वाघ्या'च्या स्मारकाबाबत मुख्यमंत्र्यानी स्पष्ट केली सरकारची भूमिका

**मुंबई : प्रतिनिधी**

वाघ्या कुत्र्याच्या समाधीबाबत सर्वांनी एकत्र बसून चर्चेतून मार्ग काढला पाहिजे असे मुख्यमंत्री म्हणाले आहेत. या संदर्भात सगळ्यांशी चर्चा करावी लागेल. कारण शेवटी त्याच्याकरिता पैसे होळकरांनी दिलेले आहेत. त्यामुळे तो असा कसा काढून टाकणार याबाबत मोठ्या प्रमाणात समाजाचा रोष देखील आहे. इतके वर्ष झाले त्या ठिकाणी तो वाघ्याच्या पुतळा किंवा समाधी आहे. त्यामुळे या प्रकरणात सर्वांशी चर्चा करून वाद न करता मार्ग निघू शकतो. प्रत्येक गोष्टीत वाद केलाच पाहिजे असं काही आहे का? असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले आहेत.



रायगडावरील वाघ्या कुत्र्याचे स्मारक सध्या चर्चेत आले आहे. छत्रपती घराण्याचे वंशज संभाजीराजे छत्रपती यांनी या वाघ्या कुत्र्याचे स्मारक रायगडावरून हटवण्यात यावं, अशी मागणी करणारं पत्र राज्य सरकारला दिलं आहे. यासाठी संभाजीराजे छत्रपती यांनी ३१ मे पर्यंतची मुदत देखील दिली आहे. दरम्यान, यानंतर धनगर समाजाचे नेते लक्ष्मण हाके यांनी वाघ्या कुत्र्याचे स्मारक हटवण्यास विरोध दर्शविला आहे. यानंतर यासंदर्भात अनेक राजकीय नेत्यांनी याबद्दल प्रतिक्रिया दिल्या. यादरम्यान या वाघ्या कुत्र्याच्या स्मारकाबद्दल राज्य सरकारची नेमकी भूमिका काय? याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केले आहे.

वाद करण्याचं काही कारण नाही. सगळ्यांनी बसून मार्ग काढावा. उगाच दोन समाज एकमेकांसमोर उभे झालेले दिसतात इकडे धनगर समाज वेगळा आणि इकडे मराठा समाज वेगळा असं काही नाही. सगळे समाज एकमेकांसोबतचे समाज आहेत. त्यामुळे या बाबतीत वाद करणं अयोग्य आहे, बसून मार्ग काढला पाहिजे, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

वाघ्या कुत्र्याच्या समाधीच्या मुद्द्यावर संभाजीराजे यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यासाठी त्यांची वेळ मिळत नाही असे म्हटले होते. यावर देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य केले आहे. मी त्यांना अनेक वेळा वेळ दिलेली आहे. पण त्यांना असं का वाटतं माहिती नाही. मी दरवेळेस त्यांना वेळ देतो. ते माझ्याशी फोनवरही बोलतात, मला येऊनही भेटतात. त्यामुळे वेळ न मिळण्याचे काही कारणच नाही.

## भिवपुरी रोड रेल्वेस्थानकाजवळ सहा दुचाकी जळून खाक

**कर्जत, नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वे स्थानकातून मुंबईकडे जात असताना पहिलेच रेल्वे स्टेशन असलेल्या भिवपुरी रोड रेल्वे स्थानकात नजिक लावण्यात आलेल्या सहा दुचाकी अगीच्या भक्षस्थानी पडल्या. या दुचाकी उभ्या करण्यात आल्या होत्या. त्या भागातील गवताला आग लागली आणि तेथे असलेल्या सहा दुचाकी जळून खाक झाल्या.



भिवपुरी रोड रेल्वे स्थानकातून दररोज हजारो प्रवासी प्रवास करतात. त्यामध्ये विद्यार्थी, चाकरमानी, दुग्धव्यवसायिक आणि अन्य प्रवासी नेहमी प्रवास करीत असतात. या रेल्वे स्थानकाच्या परिसरात अनेक गावे आहेत. त्या गावांतील अनेक प्रवासी आपल्या दुचाक्या रेल्वे स्थानकाच्या परिसरात उभ्या करतात. आज दुपारी एकच्या सुमारास ज्या ठिकाणी दुचाकी उभ्या केल्या होत्या त्या परिसरातील गवत पेटले होते. हवा असल्याने ती आग दुचाकी उभ्या असलेल्या ठीकाणी असलेल्या गवता पर्यंत पसरली व दुचाकींनी पेट घेतला.

आज दुपारी रेल्वेचा मेगा ब्लॉक असल्याने परिसरात प्रवाशी नागरिकांची वर्दळ कमी होती.तर मोटरसायकल ह्या रेल्वे स्थानक सोडून लांब पार्क केलेल्या असल्याने परिसरात नागरिकांच्या चटकन लक्षात आले नाही.मोटरसायकलला लागलेली आग हवेत दूरवर आगीचे धूर दिसल्याने परिसरात ऐकाच खळबळ उडाली होती.भर उन्हात दुपारच्या सुमारास हा प्रकार समोर येताच परिसरातील रेल्वे कर्मचारी आग विझवण्यासाठी धावून गेले होते.

आग विझविण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना यश आले नाही. या आगीत तेथे असलेल्या सहा दुचाकी जळून खाक झाल्या. त्या कोणाच्या होत्या याची माहिती सायंकाळी कामावरून परतणाऱ्या प्रवाशी नागरिक आल्यावर समजेल, असे स्थानिकांकडून सांगण्यात येत होते.

## रेवदंडा समुद्रकिनारी भटक्या कुत्र्यांमुळे भितीचे वातावरण

**रेवदंडा: प्रतिनिधी**

रेवदंडा समुद्र किनारी आढळणारी भटक्या कुत्र्यांची मोठी संख्या भितीचे वातावरण निर्माण करणारी आहे, या उनाड कुत्रांचाबदोबस्त संबधीतानी करावा, अशी मागणी केली जात आहे.



रेवदंडा समुद्र किनारी कुत्रांची मोठी गॅग ठिकठिकाणी उभी असलेली दिसते, सकाळी मार्निग वॅाकच्या निमित्ताने समुद्रावर फेरफटकामारताना ही उनाड कुत्री अंगावर भुंकत येत असतात, त्यामुळे हातात काठी घेवूनच मार्निग अपला जावे लागते. समुद्रकिनारी गॅग करूनउभी असलेली कुत्री मनात भिंती निर्माण करते.


रेवदंडा समुद्र किनारा पर्यटक, पै-पाहूणे तसेच स्थानिक मोठया संख्येने भेट देत आहेत, कुत्रांची वाढती संख्या मात्र येथे भितीचेनिर्माण करते, त्यामुळे समुद्र किनारी फिरणे, धावणे, चालणे यासाठी मोकळेपणा प्राप्त होत नाही. समुद्र किनारी फेरफटका मारताना नित्यानेही उनाड कुत्री अंगावर भुकंत धावून जात असल्याचे चित्र दिसते.

विशेषतः सकाळच्या सुमारास ही कुत्रांची टोळकी समुद्र किनारी बांगडत असलेली दिसतात. या कुत्रांच्या टोळ्याची हद्दी ठरलेली असते, तर एखादा दुसर्या टोळीचा कुत्रा अथवा कुत्रांची टोळकी हद्द सोडून आल्यावर कुत्रांचे गॅगवार सुरू होते, त्यामुळे येथून जा-ये करणे नेहमी भितीचे ठरते.

## राज्यमार्गाच्या बाजूला केबलसाठी खोदकाम साईडपट्टी नष्ट

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील नेरळ कळंब या वर्दळीच्या रस्त्यावर महिनाभरापूर्वी साईड पट्टी लगत केबल टाकण्याचे काम करण्यात आले. त्या रस्त्यावर एका खाजगी नेटवर्क कंपनीकडून केबल टाकण्यात येत आहे.हि केबल टाकण्यासाठी रस्त्याच्या बाजूची साईडपट्टी खोदून केबल टाकण्यात आली आहे. कंपनी आणि कंत्राटदार यांनी साईटपट्टी खोदून नष्ट केली आहे.



सार्वजनिक बांधकाम विभाग केबल कंपनीला सहकार्य करीत असल्याने रस्त्याची दुरवस्था होत असून त्या ठिकाणी अपघाताची स्थिती निर्माण झाली आहे.

नेरळ-कळंब रस्त्याच्या या साईडपट्टीच्या दुर्दशेमुळे रस्त्याच्या बाजूने पायी चालणे म्हणजे स्वतःचा जीव धोक्यात घालणे असे समीकरण बनले आहे. या रस्त्यालगत साईडपट्टी नष्ट झाल्याने बस वाहतूकदार यांच्यासह दुचाकी चारचाकी खासगी वाहन चालकांना आपला जीव वाचवत प्रवास करावा लागत आहे. साईडपट्टी नसल्याने अनेक अपघात थोडक्यात वाचले तर काही निसटते अपघात देखील झाले. प्रवासी आणि वाहतूकदार यांच्या जीविताशी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना काहीही देणेघेणे नसावे असे वाटत आहे.

रस्त्याची साईड पट्टी खोदण्याचे काम सुरू असताना सदर जबाबदार अधिकाऱ्यांना सदर बाब निदर्शनास आणून दिलेली होती. तसेच या रस्त्यावर काम करणाऱ्या पोट ठेकेदारांना व कामगारांनादेखील याबाबत सावध केले होते, परंतु ज्या कंपनीने हे काम हाती घेतले होते त्या कंपनीची ही जबाबदारी होती. तसेच संबंधित खात्याने या कामास साईडपट्टी वापरण्याची परवानगी अथवा भाडे पट्ट्याने साईडपट्टी सदर कामासाठी दिलेली असल्यास याबाबत प्रवाशांना व वाहतूकदारांना अवगत करणे आवश्यक होते. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी सदर खोदलेली साईड पट्टी पूर्ववत करणे आवश्यक असताना त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले असून ही बाब अत्यंत गंभीर आहे.

नेरळ कळंब रस्त्यावरील साईडपट्टी चक्क खोदून टाकण्यात आलेली आहे. असे घडत असेल तर संबंधित खात्याने कोणत्याही खाजगी कंपनीला रस्त्याची साईडपट्टीवर काम करण्याची परवानगी देऊ नये.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी राम प्रहर

## रोहा पोलिसांनी सापळा लावुन चोरट्यांना शिताफीने पकडले

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा पोलिस ठाणे हद्दीत भागीरथी खार गोफण येथे एक वृध्द महिलेची गळ्यातील तीन तोळ्याची सोन्याची माळ जबरदस्तीने खेचून पळणाऱ्या जोडप्याला पकडण्यात रोहा पोलिसांना यश आले आहे

रोहा पोलिस ठाणे हद्दीत भागीरथी खार गोफण येथे एक वृध्द महिला नीलिमा नारायण वरसोलकर,वय ६५ वर्षे राहणार.रा-भागीरथीखार ह्या सुखी मच्छी विकण्याचा व्यवसाय करतात. सदर ठिकाणी एक नवरा बायको जोडपे बर्गमन गाडी वरून येऊन थोडी सुखी मच्छी विकत घेतली व काही वेळानी त्यांनी हेल्मेट घालून तोंडाला रुमाल बांधून सदर वयोवृद्ध महिलेच्या गळ्यातील ३ तोळ्याची सोन्याची माळ जबरदस्तीने खेचून तेथून रोहा शहराकडे पळ काढला. वृद्ध महिलेने आरडाओरड केल्याने तेथील जागरूक नागरिकांनी लागलीच रोहा पोलीस ठाणे येथे सदर घटनेबाबत माहिती दिली

पोलीस निरीक्षक पाटील यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून खारी चेकपोस्ट येथे पोलीस अमलदारांसह नाकाबंदी लावली.काही वेळातच गुन्ह्यातील पळ काढणारे जोडपे खारी चेकपोस्ट येथे आले असता नाकाबंदी करणाऱ्या पोलिसांनी त्याना अडविण्याचा प्रयत्न केला असता वेगाने गाडी पळवून तांबडी गावाकडे पळून गेले. त्यावेळेस त्याठिकाणी नाकाबंदी करणारे पो. ना.शिरसाठ, पोशी अनिल पाटील,पोशी अंगद गुट्टे,पोशी मुसळे व होमगार्ड यांनी त्यांचा दुचाकीवरून पाठलाग करून अत्यंत चपळाईने त्यांना काही अंतरावरच रोखून ताब्यात घेतले आणि ०३ तोळ्याची सोन्याची माळ आरोपींकडून हस्तगत केली.

## उतेखोलवाडी शाळेत आरोग्य शिबिर उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील शैक्षणिक क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या रायगड जिल्हा परिषद पीएमश्री उतेखोलवाडी शाळेत शुक्रवार दि.२८ मार्च रोजी आरोग्य शिबीर आरोग्यम धन संपदा या उक्तीप्रमाणे उत्साहात झाले

या शिबिराचे उदघाटन माणगाव उपजिल्हा रुग्णालयाचे वैदयकीय अधिकारी डॉ.दिपक देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. दिपक देशमुख व वरद हॉस्पिटल माणगावच्या स्त्रीरोग तज्ञ डॉ.नीलिमा घरत यांनी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली. डॉक्टरांनी मुलांची आरोग्य तपासणी उत्तम पद्धतीने केल्याने उपस्थित पालकांनी डॉक्टरांचे खास आभार मानले.




यावेळी बीटीएस परीक्षेत गुणवत्ता प्राप्त मुलांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला

या शिबिरात विवा कॉलेज माणगाव येथील नर्सिंगच्या डॉ.योगिता घुगे तसेच डॉ.नीलिमा घरत यांनी विद्यार्थ्यांना सुदृढ आरोग्यासाठी उत्तम असे मार्गदर्शन केले. हे शिबीर यशस्वी करण्यासाठी माणगाव विवा कॉलेजचे प्राचार्य डॉ.विवेक ढेपे, उपप्राचार्य योगेश रानभरे,शिक्षिका सुद्धा मोरे यांनी विशेष सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आदर्श शिक्षिका विनया जाधव यांनी तर शाळेच्या मुख्याध्यापिका शमिका अंबुर्ले यांनी उपस्थित डॉक्टर्स,मान्यवर,पालकवर्ग यांचे आभार मानले. माणगाव पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट व केंद्र प्रमुख शंकर शिंदे यांनी विशेष कौतुक केले.

पान १ वरुन

## आयपीएस अधिकाऱ्याचे अपघातात निधन

सुधाकर पठारे हे ट्रेनिंगसाठी हैदराबादमध्ये गेले होते. त्या ठिकाणी त्यांच्या एका नातेवाईकासह ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी जात असता हा अपघात झाला. या अपघातात सुधाकर पठारे यांच्यासोबत त्यांच्या नातेवाईकाचाही मृत्यू झाला. दरम्यान, या घटनेची माहिती तेलंगणा पोलिसांना मुंबई पोलिसांना कळवली आहे. आतापर्यंत त्यांनी पोलीस उपअधीक्षक म्हणून पंढरपूर, अकलूज, कोल्हापूर शहर, राजुरा येथे सेवा बजावली आहे.

राज्यात अनेक ठिकाणी सेवा बजावली अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून चंद्रपूर, वसई तर पोलीस अधीक्षक म्हणून सीआयडी अमरावती येथे सेवा बजावली आहे. पोलीस उपायुक्त म्हणून मुंबई, ठाणे, पुणे, वाशी, नवी मुंबई, ठाणे शहर येथे सेवा बजावली आहे. एसपी डॉ. सुधाकर पठारे यांनी पोलीस खात्यात सेवा बजावताना संघटित गुन्हेगारी (मोक्का), तडीपारी, एमपीडीए अशा प्रतिबंधात्मक कारवाईंचा धडाका लावला होता. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याबरोबरच त्यांनी पोलीस दलात अनेक विविध उपक्रम राबवले आहेत.

## पेणमध्ये पोलिसांचा रूटमार्च



**पेण : प्रतिनिधी**

गुढीपाडवा, रमजान ईद, छत्रपती संभाजी महाराज पुण्यतिथी, राम नवमी, महावीर जयंती, हनुमान जयंती, व इतर साजरे होणारे सणाच्या अनुषंगाने मा.पोलीस अधीक्षक अलिबाग यांच्या आदेशाने व उपविभागीय पोलीस अधिकारी पेण विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली रूटमार्च काढण्यात आला होता.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक पेण, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, खान मोहल्ला, महावीर मार्ग, खाटीक आळी, पेण बाजारपेठ, पेण एसटी स्टँड, नगरपालिका नाका, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक या मार्गावर रूटमार्च झाला.

या वेळी दंगा काबू रंगीत तालीम करण्यात आली. पेण पोलीस ठाण्यातील सहा अधिकारी, २२ पोलीस अंमलदार, चार होमगार्ड, पोयनाड पोलीस ठाण्याकडील १ पोलीस अधिकारी व पाच पोलीस अंमलदार तसेच वडखळ आरसीपी प्लॅटून ३० जवान उपस्थित होते.

## हिंदू नववर्ष स्वागतासाठी खोपोलीत आज भव्य रॅली

**खोपोली : प्रतिनिधी**

विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, त्याचप्रमाणे हिंदू संघटनांतर्फे खोपोली शहरात रविवारी हिंदू नववर्ष शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवारी (दि.३०) सायंकाळी ५:३० वाजता गुढीपाडवा शोभा यात्रेचा खालची खोपोली येथील अग्निशमन केंद्रा जवळ या यात्रेचा प्रारंभ होत आहे. खालची खोपोली, मुख्य बाजारपेठ, दीपक चौक, जेनीट कॉर्नर, असा शोभा यात्रेचा मार्ग असून, समारोप दक्षिणमुखी मारुती मंदिरात होणार आहे.

या यात्रेला ढोल ताशा पथक, तसेच मातृत्व कर्तृत्व व नेतृत्व नारिशक्तीचे या शोभायात्रेत आकर्षण असणार आहे, शालोम एज्युकेशन या गतिमंद शाळेचे विद्यार्थीही आपली लेझीम कला सादर करणार आहेत. या यात्रेत नागरिकांनी सहभाग घ्यावा असे आव्हान विश्व हिंदू परिषद, व हिंदू समाजातर्फे करण्यात आले आहे. वरची खोपोली येथील लोहाना समाज येथे महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आल्याचेही आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे विहीघर, तहसील- पनवेल, जिल्हा रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्री विष्णु भागा पाटील, निराबाई लहु भोईर, सुमन चंद्रकांत म्हात्रे व सुनिता भागा पाटील, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे.

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे विहीघर, तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील जिल्हा परीषद रायगड, पंचायत समिती पनवेल, मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र | | | आकार |
|---|---|---|---|---|---|
| | | लावणी लायक | पोटखराबा | एकुण क्षेत्र | |
| | | हे. आर. प्रती | हे. आर. प्रती | हे. आर. प्रती | रू. पै |
| ५८ | १ | ०-२३-०० | ०-००-०० | ०-२३-०० | २.१२ |

वरील शेतजमीन/ मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २९/०३/२०२५**

**कार्यालयीन पत्ता**
गाळा क. १५४, पनवेल महानगरपालीका संकुल, वासुदेव बळवंत फडके नाटयगृहा जवळ, श्री दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६
संपर्क:- ८८८८२७१७५९

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं जाधव**
**बी.ए, एल.एल.बी.**
**( खरेदीदाराचे वकिल)**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# रयत माऊली लक्ष्मीबाईंना अभिवादन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांना समर्पित भावनेने साथ देत अवघ्या रयतेची माऊली ठरलेल्या त्यागमूर्ती तिर्थरूप लक्ष्मीवहिनी अर्थात लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये वहिनींना विनम्र अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात शिक्षिका संपदा म्हात्रे यांच्या नियोजनात हा कार्यक्रम सांस्कृतिक विभागांतर्गत आयोजित करण्यात आला. कर्मवीर अण्णा व लक्ष्मी वहिनी यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे, नूतन उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील, सांस्कृतिक विभागप्रमुख हर्षला पाटील, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे, प्रशांत परदेशी, शितलकुमार म्हात्रे, प्रमोद करावकर, विशांत ठाकूर, सुरेश पारखे, चित्रलेखा पाटील, चारुशीला ठाकूर, द्रौपदी वर्तक, विद्या पाटील, अस्मिता वर्तक, प्रणाली पाटील, योगिता पाटील, उर्मिला गोंधळी, चारुशीला ठाकूर, वृषाली म्हात्रे,उज्वला म्हात्रे, ज्योत्स्ना कोळी, सोनाली घरत, दर्शना भोईर या सर्वांनी रयत माऊलींच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.


या वेळी सर्व शिक्षक, कर्मचारी उपस्थित होते. लाईफ मेंबर रवींद्र भोईर यांनी गायक वृंदातील प्रत्येकास बक्षीस जाहीर केले.










आशा-आकांक्षांचे
बांधून तोरण द्वारी
यशस्वी आणि समृद्ध
जीवनाची उभारू गुढी



मराठी नववर्ष
गुढी पाडवा
सणाच्या सर्वांना
मंगलमय
शुभेच्छा !!

TIPL





शुभेच्छुक
ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लि.
an ISO 9001-2015 Certified Company

GROWING STRONG, BONDING STRONGER

Registered office : 1st floor, Om Sadnika, Plot No. 265/1, Panvel-Uran Road, Panvel, Navi Mumbai- 410206.

Tel. : 022 27452713, 9769409120
Email : thakurinfraprojects@gmail.com
Web : www.thakurinfraprojects.in


022 48964999
hiranandani communities
a niranjan hiranandani initiative
LAUNCHING
JASMINE
2 BHK BALCONY HOMES
WITH ENCHANTING VIEWS
JUST PAY ₹ 21,999 PER MONTH*
₹ 1.25 CR* (ALL INCLUSIVE)
ARTIST'S IMPRESSION
TOWNSHIP AMENITIES
Hiranandani Trust School | Medical Center | Landscaped Garden | Pedestrian Friendly
Tree - Lined Avenues | Supermarket | Retail Outlets | Restaurants | Shuttle Bus Service |
Hakone Gaming Center
HIRANANDANI
FORTUNE CITY
PANVEL
JASMINE
The project has been registered via MahaRERA registration number: Jasmine: P52000055578 and is available on the website https://maharera.mahaonline.gov.in under registered projects. PDPL/ developer secures a credit facility from ICICI Bank and Aditya Birla Finance Limited (collectively, "Lenders"), with Beacon Trusteeship Limited as Security Trustee. This facility is for the development projects at Sector B, Golden Willows ("RZ-02") and Sector D ("RZ-05"). This scheme is provided by Bajaj Housing Finance Ltd under choose your EMI plan for 36 months. Under this scheme customer can book home by paying 10% at booking, and just Rs.21,999 per month pre-EMI thereafter. The EMI holiday is basis 20 year loan eligibility. The developer has fully repaid the previous loan managed by Axis Trustee Services Limited for Axis Bank, State Bank of India, and Punjab National Bank Housing Finance Ltd. Upon sale of individual flats in the Projects, Beacon Trusteeship Limited will issue the requisite Release of Charge (ROC) or No Objection Certificate (NOC). *T&C Apply.